नि.फौ.प्र. क्र./३४/२०१८
सरकार –वि– महादेव
नि.क्र. ०८ वर पुढे सुरु.

<u>साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. के. डी. कापगते यांच्यातर्फे शपथेवर सुरुः–</u>

हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि आरोपीचे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घर माझ्या घराच्या शेजारी आहे. मी म्हशी कधी कधी चारायला नेते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीकडे म्हशी आहेत. माझ्या म्हशी आरोपीच्या घरासमोरुनच न्यावे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या आणि माझ्या म्हशींमध्ये लांबाझोंबी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि त्याच्या भावाने मला म्हशी व्यवस्थित नेत जा असे हटकले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमच्यात भांडण होऊन शिवीगाळ झाली होती. आरोपी आणि आमचे शेत लागुन आहे. तेथील रस्त्यावर जाणारे येणारे लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आमचा जाण्यायेण्याचा मार्ग आरोपीच्या घरासमोरुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर नेहमी आमच्या जनावरांच्या टक्कर होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, आमचे त्यावरुन एकमेकांना शिवीगाळ करणे व वाद करणे सुरु राहायचे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीने आरोपीला धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने मला मागुन येऊन कवटाळल्याचे व मला खाली जमिनीवर पाडल्याचे व तो माझ्या अंगावर झोपल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला ढकलण्याचा प्रयत्न करीत असल्याचे, त्याने माझे तोंड दाबल्याचे व मी त्याला धक्का देऊन माझ्या अंगावरुन लांब केल्याचे तसेच आरोपीने माझ्या अंगावरील कपडे काढण्याचा प्रयत्न केलयाचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तिथुन पळत पळत आपल्या शेतशिवारात गेल्याचे व त्याने माझ्या मागे धाऊन मला मारण्याची धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अरविंद टेकाम व त्याच्या घरच्या लोकांना त्यांच्या शिवारात जाऊन हकीकत सांगितल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पती रस्त्यातच मिळाल्याने त्यांच्यासोबत घरी येऊन हकीकत सांगितल्याचे खोटे सांगत आहे. पोलीसांनी माझे दोनदा बयाण घेतले. त्यांनी पोलीस स्टेशन मध्ये व घरी बयाण घेतले. मी पोलीसांना बयाण देतांन सरपंच मॅडमला घटना सांगितल्याचे सांगितले नाही. मी घटनेच्याच दिवशी रिपोर्ट दिला. माझा रिपोर्ट मी तोंडी दिला होता. तेव्हा माझे पती माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यानुसार रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे आणि आमचे पुर्वीपासुन पटत नसल्याने माझ्या

पतीच्या सांगण्यानुसार आरोपीला फसविण्यासाठी मी खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास समाप्त

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

(नि.प्र. तळणीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,साकोली
१२/१२/२०२३